सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक ३००

| जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/२१०/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २९/०५/२०२६ |
|---|

# अधिसुचना

पाटण पोलीस ठाणे हद्दीतुन जाणारा कराड ते चिपळुण राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई या महामार्गावर पाटण शहरातील धांडे पुलाची पुर्नबांधणी आणि बाजारपेठेतील क्रॉक्रीट रस्त्याचे काम सुरु असल्यामुळे दैनंदिन रस्ता वाहतुकीवर परिणाम होवुन वारंवार वाहतुक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागु नये म्हणुन वाहतुक सुरळीत राहणेकरीता जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/१०७/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २५/०३/२०२६ अन्वये दि. २७/०३/२०२६ ते २७/०५/२०२६ पर्यत वाहतुक मार्गात बदल करणेत आला होता परंतु अद्यापपर्यंत बाजारपेठेतील क्रॉक्रीट रस्त्याचे काम पुर्ण झाले नसल्यामुळे सदर कॉक्रीटकरणाचे काम पुर्ण होईपर्यत वाहतुक सुरळीत राहणेकरीता कराड ते चिपळुण या राष्ट्रीय मार्गावरील जाणारी व येणारी वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळविणे बाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पाटण शहरातुन जाणारा कराड ते चिपळुण राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई वरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. ३०/०५/२०२६ चे ००.०१ ते ११/०६/२०२६ चे २३.५९ वा. पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

५. **कराड व उंब्रज बाजुकडुन चिपळुण कडे जाणारी अवजड वाहतुक :-**
कराड व उंब्रज येथुन सरळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन पाचवड फाटा - उंडाळे - कोकरुड - मलकापुर - आंबा घाट - संगमेश्वर वरुन चिपळुण कडे जाईल.

६. **चिपळुण कडुन कराड व उंब्रज कडे येणारी अवजड वाहतुक :-**
चिपळुण वरुन संगमेश्वर - आंबा घाट - मलकापुर - कोकरुड - उंडाळे - पाचवड फाटा - राष्ट्रीय महामार्ग क्र. ०४ वरुन कराड, उंब्रज कडे जाईल.

७. **कराड व उंब्रज बाजुकडुन चिपळुण कडे जाणारी सर्व हलकी वाहतुक :-**
कराड व उंब्रज येथुन नवारस्ता - गव्हाणवाडी फाटा - नेरळे गौंड येथुन कराड ते चिपळुण महार्गावरुन चिपळुण कडे जातील.

८. **चिपळुण बाजुकडुन कराड उंब्रज कडे येणारी सर्व हलकी वाहतुक :-**

Scanned with CamScanner

चिपळुण कडुन येणारी वाहतुक नेरळे गौंड - गव्हाणवाडी फाटा - नवारस्ता मार्गे कराड व उंब्रज कडे जातील.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक २९/०५/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - २९/०५/२०२६
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) पोलीस अधीक्षक,रत्नागिरी, कोल्हापुर, सांगली, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे, कोकण परिक्षेत्र

Scanned with CamScanner